९८८६

म. ग्रं. सं. ठाणे

विषय

सं. नं.

१० सन १९८६

नाटक - १६८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

(ठाणे जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा.

पु० नांव — बालविवाह अथवा विक्रेय विवाह विचार / चमत्कारिक स्वप्न.

ले — सि. र. आधिकारी

वि० ७/८८५

१६८

सं.क्र. १०

नाटक

[illegible] [illegible]
[illegible]
[illegible]

[illegible]

[illegible]

# चमत्कारिक स्वप्न

अथवा

# बालविवाह व विधवाविवाह विचार.

---

हें

लहानसें पुस्तक

सिताराम रघुनाथ अधिकारी

सेक्रेटरी, कल्याण मुनिसिपालिटी

यानीं केलें

तें

मुंबई येथें "माजगांव प्रिंटींग" छापखान्यांत छापिलें.

---

सन १८८६ इ०.

---

ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें नोंदिली आहे.

किंमत ४ आणे.

# प्रस्तावना.

मी मोठासा विद्वान नाहीं किंवा बालविवाह व विधवाविवाह यांबद्दल सर्व लेख पहावयास मिळण्याचें मला साधन नाहीं. तसेंच या पुस्तकांत प्रतिपादन केलेले मुद्दे वगैरे मी कोणाचेही मतावरून घेतले नाहींत, परंतु खऱ्या नीतीस व स्थितीस अनुसरून जें मला योग्य आणि संभवनीय दिसलें तेंच यांत प्रतिपादन केलेलें आहे. खऱ्या नीतीच्या संबंधांत सर्वच धर्ममतांचा व रूढींचा माझ्या मतानें समावेश होत नसून मनुष्यप्राण्याच्या संरक्षणाचे व सुखाचे जे खरे मार्ग तीच खरी नीती असें माझें मत आहे, ह्मणून धर्मसंबंधाचे आधार विषयप्रतिपादनार्थ मी मुळींच घेतलेले नाहींत; कारण खऱ्या नीतिपुढें कित्येक धर्ममतांचें व रूढींचें महत्व हल्लीं मुळींच राहिलें नाहीं. तथापि धर्म मतांचा अगदींच अव्हेर करण्यासारखी व्यवस्था आतांच होऊं शकणें असंभवनीय असून तीं मतें जबरीनें एकाएकीं मोडूं लागल्यास अस्वस्थता उत्पन्न होणार आहे ह्मणून धर्ममतांचा अगदींच मोड न करतां खरी नीती संस्थापित करण्याचा मार्ग व त्यायोगें खरें दुःख नष्ट करण्याचा उपाय दर्शित करण्याचा या पुस्तकांत मी प्रयत्न केला आहे. किंबहुना ही सरकारास व लोकांस एकाप्रकारची सन्मार्गदर्शक सूचनाच अथवा पुढें घडून येणाऱ्या गोष्टींचा इशारा आहे.

यांत लोकांच्या अर्जावरून सरकारनीं कमिशनची नेमणूक करून “ बालविवाहप्रतिबंध व विधवाविवाहकरण यांबद्दल कायदा करण्याविषयीं ज्यांची हरकत असेल अशांनीं आपला पक्ष सिद्धकरण्याकरतां व विरुद्ध पक्षानीं आपलें मत प्रतिपादन करण्याकरतां आपले मुक्त्यार व पुरावा कमिशनपुढें हजर करावा व त्याचा निकाल सरकारच्या

न्याय पद्धतीला अनुसरून चौकशी चालून सरकारच्या अखेर ठरावानें व्हावा" असें सरकारनीं फर्माविल्यावरून पुढील प्रकार घडला अशी कल्पना करून या लहानशा पुस्तकाची मी रचना केली आहे. प्रतिपक्षाचे पुढाऱ्यांस केवळ प्रस्तुत सरकारी रिवाजा प्रमाणें अरोपीत किंवा प्रतिवादी समान मानणें अर्थात योग्य नाहीं व शपथेची जरूर नाहीं वगैरे कारणावरून सरकारी न्याय करण्याच्या हल्लींच्या रिवाजाप्रमाणेंच न चालतां त्या रिवाजास जरूर तितकेंच धरून चालण्याचा मी प्रयत्न केला आहे.

मला पाहिजे तितकी सवड नसल्या कारणानें वगैरे शुद्धाशुद्धाचे व इतर संबंधांत या बुकांत चुका रहाण्याचा संभव आहे. आणि यामुळेंच सुमारें एक वर्षापूर्वी हें बूक तयार झालें असून अद्याप छापलें गेलें नव्हतें. परंतु सूज्ञ वाचक त्याबद्दल मला क्षमा करून मतलब मात्र गृहण करतील अशी मला पूर्ण अशा आहे.

सि. र. अ.

# चमत्कारिक स्वप्न !

अथवा

# बालविवाह आणि विधवाविवाह विचार.

## अंक पहिला.

वरील विषयाचे संबंधानें आपण कांहीं लिहून बंधुसेवा करावी असे विचार मनांत घोळत असल्यामुळें कीं काय कोण जाणें मला थोडे दिवसांवर रात्रीं एक स्वप्न पडलें. तें खरें ह्मणा किंवा खोटें ह्मणा, पण तें सरकार व आमचे लोक यांस विचार करण्यासारखें महत्वाचें असल्यावरून प्रसिद्ध करणें योग्य वाटलें आहे. तें येणें प्रमाणें:—

**मुंबापुरींत** एके दिवशीं संध्याकाळीं ब्याकबेवर फिरत असतां माझ्यापुढें तीन संभावीत गृहस्थ चालले आहेत असें मी पाहिलें. त्यांच्या बोलण्याचालण्यावरून व पोषाखावरून ते श्रीमान् व विद्वान् असावे असें वाटलें. त्यावेळीं त्यांच्यांत पुढील प्रमाणें संवाद चालला होता. तो वाचकांचे समजण्यांत बरोबर यावा ह्मणून त्यांस व या पुस्तकांत पुढें ठिकठिकाणीं येणाऱ्या पात्रांस मी काल्पनिक नांवें दिलीं आहेत.

**दयासागरराव**—कायहो विचारराव, मग उद्यांचें कसें काय करावयाचें ?

**अभिमानराव**—मला वाटतें, स्पष्टवक्तेराव बारिस्टरास आपल्यातर्फेनें वकीलपत्र द्यावें.

**पक्षपातराव**— अहो, पण बारिस्टराशिवाय नाहींका चालावयाचें?

**दयासा०**—छे हो, बारिस्टर असला ह्मणजे विशेष सोईवार होणार आहे. पण कामिशनचा दिवस उद्यांचा असून आपली सर्व तयारी ११ वाजण्यापूर्वी झाली पाहिजे.

**पक्ष०**—मग काय चिंता आहे. आपली सर्व तयारी आहेच. फंडाची रक्कमही भरपूर आहे. आतां फक्त बारिस्टरला सर्व केस समजावून देण्याचीच खोटी.

**अभि०**—ठीक आहे. मी पाहिजे तर स्पष्टवक्तेरावाकडे उद्यां सकाळीं जाऊन सर्व केस समजावतों. कागद मात्र सर्व माझेकडे पाठवून द्या ह्मणजे झालें.

**दया०**—बरें तर, मी आपल्याकडे उद्यां सकाळीं सहा वाजल्याबरोबर कागद पाठवून देतों. पण कायहो? तुह्मांला कसें वाटतें, आपल्याला यश मिळेल?

**अभि०**—यांत काय संशय, आपलेकडेसच सर्व हुशार, वजनदार व विद्वान् लोकांचा भरणा आहे.

**पक्ष०**—पण प्रतिपक्षाची संख्या आपल्यापेक्षां इतकी-जास्त आहे कीं, केवळ त्यावरूनच कमिशनला आपल्या विरुद्ध न्याय द्यावा लागेल कीं काय कोण जाणे! शिवाय, त्यांचेकडे श्रीमान् लोकांचा भरणा मला वाटतें विशेष आहे; आणि विद्वान् व वजनदारही बरेच आहेत. तरी हें खरें कीं, इंग्रजी राज्यांत खरा न्याय, स्वतःच्या हिता-नहिताचे प्रसंगाखेरीज, मिळतोच!

**दयासा०**—पण काय हो, आपलें हें करणें जुन्या सम-

जुतीच्या धर्माभिमानी लोकांना आवडणार नाहीं; व त्याच लोकांची संख्या जास्त असल्यामुळें आपण सार्वजनीक अप्रीतिस पात्र होऊं—प्रायः झालोंच—असें ह्मटलें पाहिजे. पण काय करावें? बालविवाहाचा प्रचार आणि पुनर्विवाहाची बंदी यामुळें होत असलेलें नुकसान पाहून जी दया येते तिच्यापुढें लोक अप्रीतीची पर्वा वाटत नाहीं.

**अभि**०—कसेंही असो व कांहीं ही होवो एकदां खऱ्या लोकहिताचें हातीं घेतलेलें काम आतां कालत्रयीं शेवटास नेल्याशिवाय सोडावयाचें नाहीं.

**पक्ष**०—काय? आपणावर अप्रीति करणारेच असमंजस आहेत असें ह्मटलें पाहिजे. कारण आपला पक्ष रास्त असून परमेश्वराचे ठिकाणीं रुजू आहे.

याप्रमाणें संवाद झाल्यावर सदर्हू ग्रहस्थ निघून गेले. ह्यांच्या भाषणावरून ते दुसरे दिवशीं भरणाऱ्या कमिशन पुढें येणारे पक्षकार असावे असें मला समजलें. नंतर दुसरे दिवशीं "टाऊनहॉल" मध्यें भव्य दिवाणखान्यांत कमिशन भरलें होतें तेथें मी गेलों असें मला भासलें. तेथें पहातों तों लोकांची इतकी गर्दी झाली होती कीं, कमिशनपुढें होणाऱ्या जबान्या ऐकूं येतील अशा ठिकाणीं पोहचण्यास मला फार श्रम करावे लागले. तरीही आणखी गर्दी होतच होती व त्या गर्दीत सर्व जातीचे हिंदु व कांहीं इतर धर्मांचे लोकही मला दिसले. बरोबर ११ वाजतां कमिशनच्या कामास सुरवात झाली. अध्यक्षासुद्धां तीनच कमिशनर होते. कमिशनापुढें झालेल्या जबान्या वगैरे मला जशा आठवल्या तशा येथें दिल्या आहेत.

---

## अंक दुसरा.

आरंभीच कमिशनर व वकील यांचा संवाद झाला तो येणें प्रमाणें:—

**विचाररराव** (अध्यक्ष)—" हिंदू लोकांतील **बालविवाह व विधवाविवाह** या संबंधांत सरकारानीं हात घालावा किंवा नाहीं व तो किती घालावा " याबद्दल धर्ममतांशिवाय पुरावा पाहून सरकारास रिपोर्ट करण्याचें काम या कमिशनकडे आहे, तरी बालविवाह व विधवाविवाह या दोहोंचा परोक्ष रीतीनें जरी थोडासा संबंध आहे, तथापि त्या दोहों संबंधी पुरावा निरनिराळा घेतल्यास चांगलें असें मला वाटतें.

**न्यायसिंधुराव** (मेंम्बर)—माझेंही मत असेंच आहे. दोनही विषयांचा एकमेकांशीं फारसा संबंध नसल्या कारणानें दोहोंबद्दल पुरावा एकदम घेतल्यास गोंधळ व गैरसोय होईल.

**निःपक्षपातराव** (मेंम्बर)—माझें मतही आपल्या उभयतांशीं जुळतेंच आहे. आणि उभयपक्षाच्या बारिस्टरांसही ही गोष्ट पसंत असावी असें मला वाटतें.

**स्पष्टवक्तेराव** ( वादी तर्फेचे बारिस्टर )—आमची कांहीं हरकत नाहीं.

**राजभक्तराव** (प्र. वा. तर्फेचे बारिस्टर)—आम्हासही कबूल आहे.

**अध्यक्ष**—बरें तर, आपण पहिल्यानें **बालविवाह** घेऊं. इतकें झाल्यावर वादी **दयासागरराव** याची जबानी झाली ती येणें प्रमाणें:—

**वादी** (किंवा फिर्यादी पक्षाचे पुढारी)—हिंदु लोकांत कधींकधीं वधु ३—४ वर्षांची व वर ५—६ वर्षांचाही

असतो. पण बहुधा मुलीचें १० वर्षांपूर्वी व मुलाचें १६ वर्षां पूर्वी लग्न होतें. अशा तऱ्हेनें विवाह झाल्यामुळें परस्परांचा समागम बहुधा १६ वर्षांचे वयामध्यें होतो. कधींकधीं १० वर्षांपेक्षां कमी वयाचे मुलीचें ५० वर्षांहून अधिक वयाचे ह्यातार्‍याशीं लग्न होतें. मुलीला गुलामाप्रमाणें सासूरवास होतो व भ्रतार ऋतुप्राप्ती होण्यापूर्वी मृत्यु पावल्यास तिला जगांतील अवश्यक सुख मुळींच मिळत नाहीं व यामुळें सृष्टीच्या उत्पत्तीलाही कांहीं अंशीं हरकत होते. (प्रतिवादीच्या बारिस्टराच्या उलट तपासणी वरून) मुलींची १० वर्षांवर व मुलांचीं १६ वर्षांवर लग्नें झाल्याचींही उदाहरणें आहेत. सर्वच मुलींना सासूरवास होतो असें नाहीं. भ्रतार मृत्यु पावल्यास पुनर्विवाह करण्याची चाल नाहीं अशा जातींच्या लोकांची संख्या सर्व हिंदुच्या लोकांशीं ताडून पाहिल्यास १० हून जास्त होईल असें मला वाटत नाहीं. गुलामाप्रमाणें सासूरवास ह्मणजे मुलीला फाजील श्रम करावे लागत असून तिची काळजी घ्यावी तशी कोणीच घेत नाहीं, तिला परपुरुषाशीं बोलण्याची व परवानगी शिवाय घराबाहेर जाण्याची मनाई असते आणि घरांतील मनुष्यांबरोबर फाजील मर्यादेनें वागावें लागतें.

**अभिमानराव** ( वा. साक्षी )— मुलीचें १० वर्षांपूर्वी व मुलाचें १६ वर्षांपूर्वी त्यांच्या संमत्तीशिवाय लग्नें करण्याची सर्व हिंदुलोकांत चाल आहे. १० वर्षांहून कमी वयाचे मुलीचा कधीं कधीं ५० हून अधिक वयाचे ह्यातार्‍याशीं विवाह होतो. कित्येक मुलींस वाईट रितीचा सासूरवास होतो. ज्या जातींत पुनर्विवाह होत नाहीं त्या जातींतील मुलींचे भ्रतार मृत्यु पावल्यास त्या सृष्टींतील अवश्यक सुखास

अगदींच पराङ्मुख होतात. (उलट तपासणी) मुलींची १० वर्षांवर व मुलांची १६ वर्षांनंतर लग्नें झाल्याचींही कांहीं उदाहरणें आहेत. भ्रताराच्या मृत्यूनंतर पुनः पुनः भ्रतार करण्याची मोकळीक असणाऱ्या जातींच्या लोकांची संख्या मोकळीक नसणाऱ्या जातींच्या लोकांपेक्षां पुष्कळ जास्त आहे. वाईट रितीचा सासूरवास ह्मणजे कित्येक मुलींस श्रम फाजील व सुख कमी असून बाहेर येण्याजाण्याची व मोकळेपणीं बोलण्याचालण्याची बंदी असते.

**पक्षपातराव** (वा. साक्षी—डाक्तर)—१४ वर्षांपूर्वीं मुलीस पुरुषसंग व २० वर्षांपूर्वीं मुलास स्त्रिसंग होणें हें परस्परांचे प्रकृतीस अपकारक असून त्यामुळें त्यांस अशक्तता येऊन त्यांचे पासून उत्पन्न होणारी संततीही अशक्त होण्याचा संभव आहे. हें माझ्या विद्वत्तेस अनुसरून मी सांगतों. मी हिंदु असल्यामुळें १० वर्षांपूर्वीं मुलींचें व १६ वर्षांपूर्वीं मुलाचें लग्न करण्याची चाल हिंदुलोकांत असल्याचीही मला माहिती आहे. अविचारी लोक आपल्या सुनांस वाईट रितीनें वागवितात अशींही कांहीं उदाहरणें मला ठाऊक आहेत. (उलट तपासणी) १० वर्षांनंतर मुलींचीं व १६ वर्षांनंतर मुलांचीं लग्नेंही पुष्कळ होतात. ऋतु प्राप्तीनंतर स्त्रीला पुरुषसंगाची इच्छा होण्याचा संभव आहे व तिला तो न मिळाल्यास आणि वाईट शिक्षण व संगति असल्यास ती व्यभिचार करणार नाहींच असें ह्मणवत नाहीं. सुनांस वाईट रितीनें वागवितात ह्मणजे स्वतःच्या मुलीपेक्षां त्यांस काम फार व मोकळीक कमी असून त्यांच्या दुःखाची त्रेपर्वाई असते.

**सत्यराव** (प्रतिवादी किंवा प्रतिपक्षाचे मुख्य) पुष्कळ

मुलींचीं १० वर्षांच्या वयानंतर व मुलांची १६ वर्षांनंतर लग्नें होतात. बऱ्याच हिंदुलोकांत लग्नसंबंधी सोहाळा करण्याची जी चाल आहे तीस लहान वयाचें जोडपें असलें ह्मणजे शोभतें. हिंदुलोकांत कुटुंबांतील सर्व मनुष्यांनीं एकत्र राहण्याची रूढी असल्यामुळें आणि हिंदुरिवाजाप्रमाणें मर्यादेनें वागून घरांतील व संसारासंबंधी कामें करण्यास शिकावीं ह्मणून, तसेंच तिला सासरच्या मनुष्यांचा सहवास व्हावा ह्मणून मुलगी लहान असतां लग्न करतात. बहुतेक मुलींस क्रूरपणाचा सासूरवास नसतोच व क्वचित् कोणास असलाच तर त्यांच्या माहेरचीं मनुष्यें मुलींच तीस सासरीं न पाठविण्यास मुखत्यार असून त्यांचे नवरे समजांत आल्यावर ते सर्व गोष्टींचा बंदोबस्त करून आपल्या स्त्रियांस घेऊन येतात. शिवाय घरांत वडील मनुष्यांपैकीं फाजील सासूरवासाचा प्रतिबंध करणारें कोणीतरी असतातच. पुनर्विवाह करण्याची चाल नाहीं अशा जातींच्या लोकांची संख्या इतर जातींच्या लोकांशीं ताडून पाहिल्यास फारच थोडी आहे. मर्यादेचें शिक्षण सासरीं लागतें तसें माहेरी लागत नाहीं. ( फिर्यादीच्या बारिस्टराच्या उलट तपासणीवरून ) मुलींची १० वर्षांपूर्वीं व मुलांचीं १६ वर्षांपूर्वींही लग्नें करतात. त्यावयापूर्वीं लग्नें करूंच नयेत असें झाल्यास मुली नवऱ्यांच्या घरीं हव्यातशा मर्यादेनें रहाणें, त्यांस ग्रहकृत्यांचें चांगलें शिक्षण मिळणें व वाईट वर्तन लागण्याचा प्रतिबंध होणें या गोष्टीस व्यत्यय येईल. तसेंच पुष्कळ मुलगे स्त्रिचें बंधन नसल्यामुळें संसाराबद्दल बेपर्वा राहून बदफैली होतील. वडिलांच्या सम्मतीची जरूर न राहिल्यास व प्रीतिविवाह होऊं लागल्यास कुटुंबांतील मनुष्यें एकत्र रहाण्याच्या

चांलीस मोठाच व्यत्यय येऊन सर्वांच्या संसाराचा विघाड होऊन व्यभिचार फार मातेल, आणि ही गोष्ट हिंदुलोकांस मुळींच पसंत न पडून यापासून अनर्थ होतील. फार लहानपणीं लग्नें झाल्यामुळें पुनर्विवाहाची चाल नसणाऱ्या जातींतील मुलींचे भ्रतार ऋतुप्राप्तीपूर्वी मेल्यास एका प्रकारच्या जगांतील अवश्यक सुखास त्या मुळींचअंतरतात हें खरें.

**धर्मनिष्टराव**--(प्र. त. साक्षी)--कित्येक मुलींचीं १० वर्षांनंतर व मुलांचीं १६ वर्षांनंतरही लग्नें होतात. हिंदुलोकांत कुटुंबाचीं मनुष्यें एकत्र राहण्याची जी चाल आहे ती कधींही मोडली जाणार नाहीं व तिला अनुसरून मुलांचीं लग्नें लहानपणींच झालीं पाहिजेत. मुलींस कुरपणाचा सासूरवास होतोच असें नाहीं व कदाचित् होत असलाच तर त्याचा प्रतिबंध माहेरच्या मनुष्यांकडून होऊं शकतो. पुनर्विवाहाची चाल नाहीं अशा जाती फार थोड्या आहेत. (फि. वा. उलट तपासणी वरून) हिंदुलोकांत फार लहान असतांही मुलांचीं लग्नें होतात. १० वर्षांपूर्वी मुलींचीं व १६ वर्षांपूर्वी मुलांचीं लग्नें होण्याची बंदी झाल्यास हिंदु रिवाजाप्रमाणें वागणूक होण्याचें शिक्षण मुलींस मिळणार नाहीं व मुलगेही बिघडतील. वडिलांच्या सम्मतीशिवाय प्रीतिविवाह सक्तीनें होऊं लागल्यास तर अनर्थ होतील व ही गोष्ट हिंदुलोकांस मुळींच कबूल होणार नाहीं.

**नीतिसागरपंत** (प्र. साक्षी)--कित्येक मुलांची चांगली प्रौढ झाल्यावरही लग्नें होतात. हिंदु लोकांतील कुटुंबाचीं मनुष्यें एकत्र रहाण्याची चाल मोडली जाणें फार कठीण आहे आणि ती मोडली नाहीं तोंपर्यंत मोठेपणींच लग्नें केलीं पाहिजेत अशी सक्ती केल्यास हिंदुलोकांचा फायदा होणार

नाहीं. कित्येक मुलींस क्रूरपणाचा सासूरवास होतो तो विद्या व शहाणपणा वाढल्यानें आपल्या आपण बंद होणार आहे व तसा हल्लीं बंद होतही चालला आहे, पण असा सासूरवास क्वचित् मुलींस असतो. सर्व साधारण सासूरवासाची जी चाल आहे ती पुढील सद्वर्तनाच्या शिक्षणाची होय आणि मुलांस विद्येच्या संबंधांत जितका सासूरवास असतो त्याहून मुलींस जास्त असतो असें नाहीं, मात्र तो निराळे तऱ्हेचा व हा निराळे प्रकारचा. पुनर्विवाहाची चाल नसणाऱ्या ज्ञाती फार थोड्या आहेत. (फि. बा. उलट तपासणीवरून) मुलें फार लहान असतां ही लग्नें होतात व त्यांपासून पुनर्विवाह होण्याची चाल नसणाऱ्या ज्ञातींतील मुलींचे भ्रतार ऋतुप्राप्तिपूर्वी मेल्यास नुकसान आहे. ह्मणजे जगांतील एका अवश्यक सुखास त्या मुलींच अंतरतात. पण मोठेपणीं लग्नें झाल्यास मुलींस चांगलें शिक्षण पूर्णपणें मिळण्यांत व्यत्यय येईल. वडीलांचे सम्मतीशिवाय प्रीतिविवाह होणें सर्वस्वी अनहितकारक व हिंदुरूढीस विरुद्ध आहे.

**अध्यक्ष**—स्पष्टवक्तेराव, आपणास आतां कांहीं बोलावयाचें आहे काय?

**स्पष्टवक्तेराव**—मला जें बोलणें ते दोनही प्रकरणांचे शेवटीं एकदम बोलेन.

**राजभक्तराव**—मीही माझें बोलणें अगदीं शेवटीं करीन तें बरें असें मला वाटतें.

**अध्यक्ष**—बरें आहे. बालविवाहाचा संबंध एका गोष्टींत बराच पुनर्विवाहाशीं असल्यामुळें आपलें उभयतांचें करणें मला पसंत आहे. आतां दुसरें प्रकरण उद्यां घेऊं.

इतकें झाल्यावर कमीशनचें काम बंद झालें व लोकांची बा-

हेर निघून जाण्याची एकच गर्दी उडाली. मी धक्काबुकीच्या भीतीमुळें वराच मागून निघालों. दुसरे दिवशीं लौकरच जाऊन जागा धरून बसलों. या दिवशींही कमिशनच्या कामची सुरवात बरोबर ११ वाजतां झाली.

---

## अंक तिसरा.

**अध्यक्ष**—मेहेरबानीकरून मुद्याबाहेरचा मजकूर विचारून उगीच जबान्या वाढवूं मात्र नका, इतकेंच आरंभी माझें सांगणें आहे.

**दयासागरराव** ( वादी )—ब्राह्मण व कित्येक इतर ज्ञातींत मुलींच्या पहिल्या लग्नाचा नवरा मृत्यु पावला ह्मणजे पुनः नवरा करण्याचा अगर लग्न करण्याचा प्रतिबंध आहे. कोणी केल्यास तिला ज्ञातीभ्रष्ट करतात. त्यांस वैधव्यांत राहवें लागतें तेव्हां त्यांचें वपन करतात, मग त्यांस केश-वाढवण्याची मोकळीक नसते, व त्या स्थितींत त्यांस ऐष-आरामाचे, सर्व पदार्थ जसे अनेक दागीनें, चांगलीं वस्त्रें, वगैरे वर्ज करावे लागतात. आणि नवऱ्याप्रमाणें प्रीतीनें व हक्कानें पाळण करणारें कोणी नसल्याकारणानें त्यांचे सर्वप्रकारें हाल होत असतात. कित्येकांस कामविकार सहन न होऊन आणि त्याच्या शांतीचा उघड मार्ग नसल्यामुळें त्या गुप्तपणें व्यभिचार करतात व गरोदर राहिल्यावर आपलें कृत्य उघडकीस येऊं नये ह्मणून कांहीं औषधोपचार करून गर्भपात करतात किंवा प्रसूत झाल्यास अज्ञान अर्भकांचा नाश करतात. (प्र. बा. उलट तपासणी वरून) वपनादिकें करून विद्रुप व कामविकारमंद बनविल्यामुळें व्यभिचार कमी होण्याचा संभव असतो. पुष्कळ विधवांचा

प्रतिपाळ त्यांचे आप्तसंबंधी कधींकधीं नवऱ्याहून अधिक प्रीतीनें करतात. पुनर्विवाह सक्तीनें सुरू केल्यास सरकारानीं धर्मसंबंधांत हात घातल्यासारखें होऊन कदाचित् त्यामुळें अनर्थ होईल. धर्माचरणी विधवांस ऐषआरामाची व विद्रुपतेची पर्वा नसेल.

**अभि०** (वा० साक्षी)—हिंदुंतील कित्येक जातींत पुनर्विवाह होत नाहीं व कोणी केल्यास त्यांस ज्ञातीभ्रष्ट करतात. विधवांस विद्रुप करतात व ऐषआरामाच्या सुखाची त्यांस मोकळीक नसते. गरीब लोकांच्या विधवांचा प्रतिपाळ चांगला होत नाहीं. त्या पैकीं कित्येक गुप्तरूपें व्यभिचार करतात व कधीं कधीं त्याचा परिणाम बालहत्येवरही येतो. (प्र. वा. उलट तपासणीवरून) विधवांस विद्रुप व कामविकारमंद बनविल्यापासून व्यभिचार कमी होण्याचा संभव असतो. पुनर्विवाह करण्याबद्दल कायदा झाल्यास हिंदुलोकांस आवडणार नाहीं व त्यामुळें सरकारांनीं धर्माच्या बाबतींत हात घातला असें होईल. धर्माचरणी विधवांस ऐषआरामाची व विद्रुपतेची पर्वा कदाचित् नसावी.

**पक्ष०** (वा. साक्षी)—कित्येक उंच जातींत पुनर्विवाह करीत नाहींत, कोणी केल्यास त्यांस जाती बाहेर ठेवतात. विधवांस विद्रुप बनवितात आणि ऐषआरामादि सौख्यांची त्यांस बंदी असते. गरिबांच्या विधवांचा प्रतिपाळ होत नाहीं. कित्येक विधवा व्यभिचार करतात व त्यामुळें कधींकधीं बालहत्या होतात. (प्र. वा. उलट तपासणीवरून) विधवांस विद्रुप आणि कामविकारमंद बनविल्यामुळें व्यभिचार कमी होण्याचा संभव असतो. पुनर्विवाह करण्याबद्दल सक्तीचा कायदा झाल्यास तो हिंदुलोकांस न

आवडल्यामुळें काय परिणाम होईल कोण जाणे! असें करणें ह्मणजे सरकारांनीं धर्म संबंधांत हात घातल्यासारखें आहे हें खरें. धर्मावर श्रद्धा असणाऱ्या व त्यास अनुसरून चालणाऱ्या विधवांस विद्रुपतेची व ऐषआरामाची पर्वा नसेल.

**सत्यराव** (प्रतिवादी)—धर्माचरणी हिंदुविधवांस विद्रुप व कामविकारमंद बनवितात त्यामुळें व्यभिचार बंद होतो व त्यांस त्याबद्दल वाईट वाटत नाहीं. त्यांचा प्रतिपाळ त्यांचे आप्त संबंधी करतात व गरिबांच्या विधवांस दुसऱ्यांची घरगुती नोकरी करून उदरनिर्वाह चालविण्याची मोकळीक असते. पुनर्विवाह सक्तीनें करण्याचा कायदा झाला तरी तो करणारांस ज्ञातीभ्रष्ट करण्याचा हिंदुलोक आग्रह धरतील असें वाटतें. पुनर्विवाह करण्याची चाल प्रचारांत आल्यानें व्याभिचार व बालहत्या होणार नाहींच असें ह्मणवत नाहीं; कारण पुनः पुनः विवाह करण्याची चाल असणाऱ्या लोकांतही—नवऱ्याबरोबर बेबनाव होऊन पृथक राहून व्यभिचार केल्यामुळें वगैरे—बालहत्या झाल्याचीं उदाहरणें आहेत. (वा. बा. उलट तपासणी करून) बालविवाहाची बंदी होईल तर ऋतु प्राप्तीपूर्वीं होणाऱ्या विधवांची संख्या कदाचित् कांहीं कमी होईल. पुनर्विवाहाच्या चालीमुळें बालहत्या कमी होण्याचा संभव आहे, पण पुनर्विवाह करणाऱ्यांस ज्ञाती भ्रष्ट करण्याची बंदी करवणार नाहीं. वैधव्यांत अर्थात् नवऱ्याप्रमाणें हक्काचें प्रतिपालक कोणी नसतें असें ह्मटल्यास चालेल. धर्मसंबंध एका बाजूस ठेवल्यास वपनादी विधी मनुष्यपणाचे विरुद्ध

आहे. वृद्धाबरोबर लहान मुलीचें लग्न करण्याची रीत बंद झाल्यास विधवांची संख्या कांहीं कमी होईल.

**धर्मनि०** (प्र. वा. साक्षी)—व्यभिचाराच्या बंदी करतां विधवांस विद्रूप व कामविकारमंद बनवितात आणि धर्माचरणी विधवांस त्याचा विधिनिषेध वाटत नाहीं, कारण पारलौकिक विचार करणारांस व पराधीनता न आवडणारांस कामेच्छा व सुखाची पर्वा नसते; अन्य धर्मांतही अविवाहीतपणानें स्त्रिाय व पुरुष जन्मभर राहिल्याचीं व ऐषआरामांची बेपरवा करणारांचीं पुष्कळ उदाहरणें आहेत, पुनर्विवाह करणारांस ज्ञातिभ्रष्ट करूं नका असें सरकारानें सागणें ह्मणजे धर्म संबंधांत हात घालण्यासारखें आहे. ज्ञातिभ्रष्ट होऊन पुनर्विवाह करणारास हिंदू लोक अडथळा करीत नाहींत. (वा. बा. उलट तपासणीवरून ) बाल विवाह बंद केल्यास ऋतुप्राप्तीपूर्वी होणाऱ्या विधवांची संख्या कदाचित् कांहीं कमी होईल. सरकारी कायद्याप्रमाणें बालहत्येची बंदी आहेच. धर्मसंबंधामुळें पुनर्विवाहाची सक्ती सरकारानें करणें योग्य नसून लोकांनीं त्याबद्दल बंदोबस्त स्वसंतोषानें आपण होऊनच केल्याशिवाय उपाय नाहीं. वृद्धाबरोबर लहान मुलीचें लग्न करण्याची चाल बंद झाल्यासही विधवांची संख्या कांहींशी कमी होईल.

**नीतिसा०** ( प्र. साक्षी )—व्यभिचाराच्या बंदी करतांच विधवांस, विद्रूपकारक आणि कामविकारमंद करतात ह्मणजे कामेच्छा कमी होईल अगर मुळींच होणार नाहीं असे उपचार करतात. धर्माचरणी शुचिर्भूत स्त्रियांस त्याबद्दल वाईट न वाटण्याचा संभव आहे. पुनर्विवाह करणारांस ज्ञातिभ्रष्ट करूं नका असें सरकारानें सांगणें ह्मणजे धर्म-

संबंधांत हात घालण्यासारखें आहे व अशा तऱ्हेनें हात घातल्यास लोकांत असंतुष्टता उत्पन्न होण्याचा संभव आहे. ज्ञातिभ्रष्ट होऊन पुनर्विवाह करणारांस हिंदु लोक अडथळा करित नाहींत. बालहत्येची बंदी कायद्यावरून आहेच; पुनर्विवाह केल्यानें बालहत्या होणार नाहींच असें ह्मणवत नाहीं, कारण नवराबायकोचा बेबनाव होऊन बायको पृथक राहिल्यास व तिनें बदकर्म केल्यासही तिचेकडून बालहत्येचा प्रकार घडण्याचा संभव आहे; या प्रमाणें पुनः पुनः विवाह करण्याचा सांप्रदाय असणाऱ्या ज्ञातींत व धर्मांत हीं बालहत्येचीं उदाहरणें घडलीं आहेत. ( वा. बा. उलट तपासणीवरून ) बालविवाहाची बंदी झाल्यास ऋतुप्राप्ती पूर्वी होणाऱ्या विधवांची संख्या कमी होण्याचा संभव आहे. वृद्धांबरोबर लहान मुलींचीं लग्नें करण्याची बंदी झाल्यास विधवांची संख्या कमी होईल. पुनर्विवाहाच्या चालीनेंही कदाचित् बालहत्या कांहींशा कमी होतील. धर्मसंबंध एका बाजूस ठेवल्यास वपनादिविधी मनुष्यपणाला अयो-ग्य आहे.

**स्पष्ट वक्तेराव** ( वादी तर्फेचे बारिस्टर )—रयते-च्या अर्जावरून नेमलेल्या या कमिशन पुढें झाले-ल्या साक्षी पुराव्यावरून कमिशनाच्या लक्षांत सर्व प्रकार आलाच असेल, तथापी माझ्या कर्तव्याला अनुसरून मला जें कांहीं थोडेसें बोलावयाचें आहे तें मी बोलतों. हिंदू लोकांत बालविवाहाची जी चाल आहे तिचा परिणाम कधीं कधीं इतका चमत्कारिक होत असतो कीं, २।४ वर्षांची मुलगी व ५।६ वर्षांचा मुलगा यांचा विवाह होतो, त्यामुळें तीं प्रौढ वयांत आल्यावर कधीं कधीं एकमेकास

आवडत नाहींतशीं होतात व त्यामुळें त्या परस्परांत बेबनाव होतो; तो नच झाला तरी त्यांचा समागम इतक्या अल्प वयांत होतो कीं, त्या योगें तीं लौकरच अशक्त व अल्पायुषी होतात व त्यांचेपासून होणारी संततीही अल्पायुषी व अशक्त अशी होते. शिवाय मुलीचा नवरा स्वतंत्र व प्रौढ होऊन त्याला आपल्या स्त्रीची प्रीती लागे तोंपर्यंत मुलीचा प्रतिपाळ परक्या लोकांच्या हातीं असल्या कारणानें तिला कष्टकारक सासुरवास काढावा लागतो आणि मुलाच्या समोर लहानपणापासूनच त्याची बायको असल्यामुळें त्याचें लक्ष विद्याभ्यासावरून लौकरच उडतें. तसेंच कित्येक मुलींचे कधीं कधीं ५० हून अधीक वयांच्या म्हाताऱ्यांशीं विवाह होतात, त्यामुळें त्यांस लौकरच वैधव्य प्राप्त होऊन त्या मानुष्यावश्यक सर्व सुखांस अंतरतात. ज्या ज्ञातींत पुनर्विवाह होत नाहीं त्या ज्ञातींतील मुलीचा नवरा ऋतुप्राप्तीपूर्वीं गत झाल्यास बिचारीचा जन्म अगदींच फुकट जाऊन ती सर्व सुखास अंतरते आणि पिंजऱ्यांतील पक्ष्याप्रमाणें अंतःकरणांत झुरत असते. ऋतुप्राप्ती नंतर भ्रतार मृत्यु पावल्यासही कमी दुःख आहे असें नाहीं. त्यांचें वपन करवतात, त्या ऐषआरामाच्या सर्व सुखास पराङ्मुख होतात आणि त्यांचें पोषण करणें त्यांचे आप्तवर्गास भार वाटतो. बिचाऱ्यांचे आईबाप असतील तर मात्र पालन बरें होतें, पण त्यांचें हृदय यांचेकडे पाहून क्षणोक्षणीं दुःखानें भरून येतें. विधवा स्त्रिया आपल्या तारूण्याच्या भरांत जेव्हां आपल्या वयाच्या सुवासिनी स्त्रियांस नटतां थटतांना व सुख भोगतांना पहातात तेव्हां त्यांच्या अंतःकरणांत जें दुःख होत असेल तें वर्णनच

करवत नाहीं ! त्या बिचाऱ्या उघड नाहीं तरी अंतस्थ ढळढळां रडत असतात ! शिवाय कामानळामुळें तर त्यांचें अंतःकरण दहनच होत असतें असें ह्मटल्यास चालेल !! त्यांच्या दुःखाच्या विरुद्ध नुसतें मुखानें प्रतिपादन करणारांस त्यांची खरी स्थिती कोठून कळेल ! हर हर !! क्षुधेनें व्याकूळ झालेल्याचे पुढें पंचपक्वान्नांचें ताट (पुरुषसंग व ऐष्आराम) दिसत असून व दुसरे त्याचा उपभोग घेत असलेले पाहून आणि याला त्यांतील एक ग्रासही मिळत नाहीं ह्मणून एखाद्याच्या अंतःकरणाची जी स्थिती होत असावी त्याहूनही अधीक असें अंतस्थ दुःख पदोपदीं विधवांस होत असतें. कित्येक तर वारंवार अश्रुपात ढाळून झुरत असतात ! शेवटीं कित्येकांस काम वेदना असहनीय होऊन त्या व्यभिचाराला प्रवृत्त होतात व पुढें गरोदर झाल्यास अब्रु संरक्षणार्थ आणि ज्ञातिभ्रष्टतेला व सरकारी कायद्याला भिऊन गर्भपात किंवा बालहत्या करण्यास प्रवृत्त होतात. मग तर त्यांचेवर दुःखाचा पर्वतच कोसळतो !! सबब न्यायी व दयाळू सरकारानें या सर्व गोष्टी बद्दल चांगला विचार करून धर्म आणि सर्व चालीरीती एका बाजूस गुंडाळून ठेवून हे मनुष्य सुखास अनुचित् असे प्रकार, सतीची बंदी केली त्याप्रमाणें, बंद करावे. असें करण्यास कायदा करावा लागेल. तो कायदा मला वाटतें असा असावा कीं निदान १० वर्षां पूर्वीं मुलीचा व १६ वर्षां पूर्वीं मुलाचा विवाह होऊं नये, कारण बालविवाहाची बंदी झाल्यास ऋतुप्राप्तीपूर्वीं होणाऱ्या विधवांची संख्या तरी कमी होईल. तसेंच नवऱ्याचें वय नवरीच्या वयाहून २० वर्षां पेक्षां अधीक अंतराचें असूं नये, ह्मणजे वृद्धात्र-

रोवर विवाह होऊन तावडतोव वैधव्य येण्याची भीति नाहीं. आणि पुनर्विवाहाची, निदान ऋतु प्राप्तीपूर्वी वैधव्य येणारांस तरी, मोकळीक असावी. व पुनर्विवाह सजातीया बरोबर करणारांस ज्ञातिभ्रष्ट करण्याची मनाई असावी.

( हें भाषण ऐकतांना सर्वांच्या डोळ्यांतून अश्रू निघत होते. मग दुसरे उठले ).

**राजभक्तराव** ( प्रतिवादीच्या तर्फेचे बारिस्टर )—माझ्या विद्वान् बंधूनीं जें नुकतेंच भाषण केलें त्यांतील मुद्दे बहुधा सर्व खरे असल्यामुळें मला विशेष बोलण्याची जरूर वाटत नव्हती, पण कित्येक संबंधांत त्यांनीं अतिशयोक्ती करून कांहीं मजकूर ऐकणारांस त्यांचेकडून निराळ्या तऱ्हेनें समजवण्याचा प्रयत्न झाला आहे; सबब मला चार शब्द उच्चारावे लागत आहेत. हिंदुलोकांत अगदीं तान्ह्यामुलांचीं लग्नें कित्येक अज्ञान लोकांकडून जरी कधीं कधीं करण्यांत आल्याचीं उदाहरणें आहेत, तरी अशीं लग्नें तूर्त शेंकडा पांचही होत नसून ८ वर्षांवरील मुलीचें व १२ वर्षांवरील मुलाचें लग्न करण्याचीच बहुधा चाल आहे. आणि आतां दिवसेंदिवस विद्या व ज्ञान वृद्धिंगत होत असल्यामुळें यांतही विशेष जारीनें सुधारणा होत चालली आहे. तशीच वृद्धांस ( ५०वर्षांच्या वयावरील ) अज्ञान मुलगी देण्याची चालही आपल्याआपणच मोडत आहे. व एकंदरीनें पहातां अशीं वृद्धांचीं शेंकडा ३ लग्नेंही होत नसतील. पण कदाचित् कोणी अज्ञानाकडून तीं होऊं लागल्यास त्यांस कायद्याचा अगर धर्माचा चांगला प्रतिबंध नाहीं. तो सरकारानें करवा हें जरी कांहीं अंशीं उचित आहे, तथापि त्याची दिवसेंदिवस आपल्याआपण बंदी होत असल्यामुळें कायद्याची फारशी जरूर

नसून तो करण्यास बाधक कारणेंही आहेत. जसें, बाळपणीं लग्नें न झाल्यास मुलींस गृहकृत्यासंबंधीं व संसाराबद्दल चांगलें शिक्षण मिळण्यास व हिंदुधर्माला व रिवाजाला अनुसरून त्या सद्गुणी होण्यास हरकत येईल, आणि त्यांस हिंदु रिवाजाप्रमाणें—जो रिवाज एकाएकीं मोडला जाणार नाहीं—एकत्र रहाणाऱ्या कुटुंबांतील मनुष्यांमध्यें एकाएकी मिळून रहातां येणार नाहीं. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां, ज्या ज्ञातींत पुनर्विवाह होत नाहीं त्या जातींतील विधवांची संख्या आणि विधवांकडून होणाऱ्या बालहत्येचें प्रमाण कमी होण्याकरितां तरी बालविवाह निषेधाचा कायदा पाहिजे, ह्मणून जें माझ्या विद्वान् मित्रानें सांगितलें त्याचीही फारशी जरूर नाहीं असें दिसून येतें. ह्मणजे ज्या गोष्टीनें थोडा लाभ व पुष्कळ बिघाड होऊन जी गोष्ट सक्तीशिवाय आपल्याआपण घडून येणारी त्याकरतां "द्राविडी प्राणायाम" ह्म० वृथा श्रमकरणें अयोग्य आहे. कारण बालहत्येचें प्रमाण फार अल्प असून एकंदर होणारा संसाराचा बिघाडा फार मोठा आहे. नवराबायकोचा समागम लौकर होतो व त्यामुळें तीं व त्यांची संतती अशक्त होते, हेंही ह्मणणें मला रुचत नाहीं, कारण सुखामुळें शक्ती आणि दुःखामुळें अशक्तता होते, ह्मणजे खावयास जर नसेल आणि काळजींत जीव झुरत असेल तर समागम उशिरां होऊन कांहीं फायदा नाहीं, व खावयास जर चांगलें आहे आणि सर्व प्रकारचा निष्काळजीपणा आहे तर लौकर समागमानें कोणत्याही तऱ्हेची अशक्ततेची भीती नसून उलट समागम लौकर न मिळाल्यास व्यभिचार होण्याची धास्ती ( मुलगे व मुली या उभयतांसही ) असते. ती धास्ती इतरधर्मीच्यालोकांत

जरी नसली तरी आमच्यालोकांत फार आहे असें कोणीही हिंदू कबूल करील असें मला वाटतें.कारण कामोद्दीपक आहार आणि कामेच्छा या दोन संबंधांत आमच्या लोकांची स्थिती इतकी चमत्कारिक आहे कीं ऋतुप्राप्तीनंतर मुली अविवाहित राहिल्यास विधवांकडून होणाऱ्या बालहत्येपेक्षां त्यांचेकडून जास्त बालहत्या व गर्भपात होतील. आमच्या लोकांतच कामोद्दीपक आहार व कामेच्छा जास्त कां ह्मणून कोणी शंका घेतील. पण उघड आहे कीं ज्या लोकांत संपत्ती फार त्यांच्यांत ऐषआराम व काम फार असतो असा नियमच आहे. आणि आमच्यांत पूर्वीं संपत्ती फार होती हें निर्विवाद आहे. अस्तु. यावरून बालविवाह व विधवाविवाह यासंबंधांत सरकारानें लक्ष देण्यापेक्षां अगर कोणिही त्यास तिकडे लक्ष पोंहचविण्याविषयीं विनंती करण्या पेक्षां देशांत कलाकौशल्य, यांत्रिक व दुसरें उपयुक्त ज्ञान वाढवून देशांतील दरिद्र नष्ट करण्यास सर्वांनीं झटणें अवश्य आहे. आणि इकडे विद्या वाढून ज्ञान वाढलें ह्मणजे क्षुल्लक गोष्टींची सुधारणा आपल्या आपण होणार आहे. बाळपणीं विवाह झाल्यावर प्रौढपणीं कधीं कधीं नवरा बायको एकमेकांस आवडत नसल्यामुळें त्यांचा बेबनाव होतो हें ह्मणणें इतकें निर्बळ आहे कीं, तें मुळींच जमेस धरतां येत नाहीं, कारण प्रीतिविवाह केलेल्या जोडप्यांचाही बेबनाव झाल्याचीं पुष्कळ उदाहरणें आहेत. तसेंच सासुरवासाच्या संबंधाच्या ह्मणण्यांतही कांहीं अर्थ नाहीं, कारण मुलास विद्येच्या संबंधांत मुलीहून जास्त सासुरवास व श्रम असतात. त्याप्रमाणेंच मुलगी प्रौढ होण्यापूर्वीं तिला मोकळीक कमी असते, तीही स्त्रियांच्या ( विशेषें करून हिंदुस्त्रियांच्या )स्वाभाविक गुणास अ-

नुसरून गैरशिस्त गोष्ट नाहीं, कारण स्त्रियांत काम जास्त असल्यामुळें त्या स्वाभाविकपणें पुरुषां पेक्षां अविचारी असतात. काम जास्त असण्याचें दुसरें गुह्य कारण येथें सांगणें मला योग्य दिसत नाहीं. हिंदू विधवांचा प्रतिपाळही चांगला होतो व त्यांस सुवासिनी स्त्रियां पेक्षां स्वातंत्र्य व मोकळीक जास्त असून त्या सर्वदां पारलौकीक व पुण्यमय विचारांत इतक्या निमग्न असतात कीं, वपनाचें, ऐषआराम न मिळाल्याचें अगर सुवासिनी प्रमाणें कित्येक प्रकारचें सुख नसण्याचें त्या मुळींच दुःख मानीत नाहींत. शिवाय हिंदूविधवापासूनच जास्त व्यभिचार, गर्भपात किंवा बालहत्या होतात असें ह्मणण्यास चांगला आधार मुळींच नाहीं. लौकर लग्न झाल्यामुळें मुलांचें विद्याभ्यासाकडील लक्ष उडतें असें ह्मणण्यापेक्षां स्त्रियेचाही प्रतिपाळ केला पाहिजे अशी, किंवा स्त्रियेस आपली विद्वत्ता, ज्ञान व पराक्रम दाखविला पाहिजे अशी, सर्वसाधारण पुरुषांस इच्छा असल्यामुळें त्यांस काळजी लागते. शेवटीं खऱ्या राजनिष्ठेस स्मरून मी सरकारास असें सुचवितों कीं, त्यानें पुनर्विवाहाचे व वडिलांचे सम्मतीशिवाय प्रीतिविवाह करण्याचे बाबतींत तर हात मुळींच घालूं नये, कारण ऋतुप्राप्तीपूर्वीं वैधव्य आल्यास जरी पुनर्विवाहास मोकळीक असावी हें सयुक्तिक दिसतें तरी त्यांत सरकारानें हात घालणें ह्मणजे सरकारानें आपला करार "धर्मसंबंधांत हात घालणार नाहीं हा" मोडणें होय. हिंदुलोकांनीं स्वसंतोषानें आपण होऊनच बंदोबस्त केल्याशिवाय, सरकारच जर पुनर्विवाह करणारांस ज्ञातिभ्रष्ट करूं नका ह्मणून सांगेल तर, कांहीं उपयोग न होतां असंतुष्टता वाढणार आहे व त्यामुळें रयतेच्या शांततेस कदाचित् धक्का पो-

चण्याची भीती आहे तसेंच वडिलांच्या सम्मतीशिवाय प्रीतिविवाह करण्यापासून हिंदू रयतेचें अनहीत होण्याचा संभव असून सरकारास या कामांत विशेष हात घालतां येण्यासारखा नाहीं. पुनर्विवाह व प्रीतिविवाह करण्यास सरकाराकडून मोकळीक असून बालहत्येचा प्रतिबंध करणारा त्याचा कायदा आहेच आणि हिंदुलोकही तूर्त पाहिजे तसे वागत असून त्यांच्यांत दिवसेंदिवस झपाट्यानें सुधारणा होत आहेत. तेव्हां ' बालविवाह व विधवाविवाह या संबंधांत सरकारानें आतांच हात घालून लोकांच्या स्वस्थतेंत उगीच खलल उत्पन्न करण्यांत कांहींच हांसल नाहीं आणि त्याची तूर्त तितकी अवश्यकताही नाहीं.' मला खऱ्या राजभक्तीनें शेवटीं इतकेंच सांगावें लागत आहे कीं "परशत्रू व देशदारिद्य निवारण्याच्या या अणीबाणीच्या वेळीं तरी सरकारानें या निरर्थक भानगडी उपस्थित करणें चांगलें नाहीं."

इतकें झाल्याबरोबर सर्वांनीं टाळ्या वाजविल्या व राजभक्तराव खालीं बसले. मग अध्यक्ष ह्मणाले, "आह्मी हुकुमाप्रमाणें आमच्या मतासह रिपोर्ट लौकरच सरकारांत करूं व तो केल्यावर सरकाराकडून काय तो ठराव होऊन सर्वांस कळेलच" इतकें ह्मटल्यावर कामिशन उठलें.

---

## अंक ४ चौथा

सुमारें एक महिन्यानें माझे ऐकण्यांत असें आलें कीं, बालविवाह व पुनर्विवाह या संबंधांत झालेल्या कामिशन बद्दल ठराव प्रसिद्ध झाला असून त्याबद्दल ठाकूरद्वारीं उद्यां, रविवारीं, ११ वाजतां सभा भरणार आहे. त्यावरून दुसरे दिवशीं मी सदरहू ठिकाणीं गेलों तों तेथें मनस्वी गर्दी झाली होती तरीही तसाच धक्याबुक्या खात मुख्य ठिकाणाजवळ

गेलों. तेथें पहातों तों अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस, व्यवस्थापक सभासद वगैरे लोकांच्या नेमणुका होऊन सभेच्या कामास सुरवात होण्याची अगदीं संधी आली होती. या सभेस हिंदूतील सर्व जातीचे व जुन्या आणि नव्या तऱ्हेचे लोक आलेले होते आणि अध्यक्षाचे जागीं श्रीमत् शंकराचार्य जगद्गुरू मठसंकेश्वरची नेमणूक झालेली होती. मग सभेचे चिटणीस **सत्यराव** ( कमिशन पुढील प्रतिवादी ) उठून ह्मणाले:—

**सत्यराव**—कमिशन संबंधी सरकारचा ठराव सर्वांस कळण्या करतां पहिल्यानें वाचून मग जें मला बोलणें तें बोलतों, ह्मणजे पुढील व्यवस्था सभेनें करण्यास सोईवार पडेल. या ठरावांत प्रथमतः कमिशनच्या मतांचा सारांश दिलेला आहे तो अगोदर वाचला पाहिजे.

**कमिशनचें मत**—कमिशनपुढें झालेल्या पुराव्यावरून व भाषणांवरून कमिशनचें असें मत आहे कीं, अज्ञानपणानें अगर दुसऱ्या कोणत्याही कारणांनीं बालविवाह होण्यास सवड राहिल्यानें बालविधवा फार होऊन ज्या जातींत पुनर्विवाहाची चाल नाहीं त्या जातींतील विधवांची संख्या जास्त वाढण्याचा व त्यामुळें व्यभिचार, गर्भपात आणि बालहत्या जास्त होण्याचा संभव आहे. तसेंच या संबंधांत कायदेशीर व्यवस्था केल्यास सरकारानें धर्म संबंधांत हात घातल्या प्रमाणें मुळींच होत नाहीं. सबब ज्या ज्ञातींत पुनर्विवाह होत नाहीं त्या ज्ञातींत लग्नसमयीं मुलीचें वय १० वर्षांहून व मुलाचें १६ वर्षांहून कमी नसण्या बद्दल व नवरीपेक्षां नवऱ्याचें वय २० वर्षांहून अधिक असू नये अशा विषयीं कायदा होणें अवश्य आहे. या योगें द्रव्यलोभानें अती ह्मा-